स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव

प्रा.डॉ. गणेश भामे
एम्.ए., पीएच् डी.
संचालक (अतिरिक्त कार्यभार)

सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ
(पूर्वीचे पुणे विद्यापीठ)

राष्ट्रीय सेवा योजना
गणेशखिंड, पुणे – ४११ ००७

कार्यालय क्र. : ०२०–२५६२२६८८/८९
: ०२०–२५६२२६९०/९१
: ०२०–२५६२२६९२
: ०२०–२५६९७३४१

संदर्भ : रासेयो/२०२६–२७/३०१ दि. १६/१०/२०२६

प्रति,
मा.प्राचार्य/संचालक,
रासेयो संलग्नित सर्व महाविद्यालये परिसंस्था,
पुणे, अहिल्यानगर व नाशिक जिल्हा,
सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ.

विषय: मतदार याद्यांचे विशेष सखोल पुनरिक्षण कार्यक्रम २०२६ सुधारित वेळापत्रकाबाबत..
संदर्भ: १.अवर सचिव व उप मुख्य निवडणूक अधिकारी, महाराष्ट्र राज्य यांचे क्र.ईएलआर २०२६/प्र. क्र.१०६/निवडणूक–६सामान्य प्रशासन विभाग, दि.१५/१०/२०२६ रोजीचे पत्र
२.उपजिल्हाधिकारी तथा स्वीप नोडल अधिकारी, जिल्हाधिकारी कार्यालय, पुणे यांचे क्र. उपजिभूसं/१७/निवडणूक–१/कावि/३५/२०२६, दि.१३/१०/२०२६ रोजीचे पत्र

महोदय,

उपरोक्त विषय आणि संदर्भीय पत्रान्वये भारत निवडणूक आयोगाने राज्यातील मतदार याद्यांच्या विशेष सखोल पुनरिक्षणाचा(SIR) कार्यक्रमाला मुदतवाढ देण्यात आली आहे. त्यानुसार दावे व हरकती सादर करण्यासाठी दिनांक २६ ऑक्टोबर अशी मुदतवाढ दिलेली असून, अतिंम मतदार यादी दिनांक १६ नोव्हेंबर २०२६ रोजी प्रसिध्द करावयाची आहे.

त्यानुषंगाने महाविद्यालयांना विशेष सखोल पुनरिक्षणाचा कार्यक्रमाच्या अंतर्गत मतदार नोंदणी करिता सर्व मतदान केंद्रांवर विशेष नोंदणी शिबिरे आयोजित करण्याबाबत कळविण्यात आले होते. तसेच भारत निवडणूक आयोगाने दावे व हरकती सादर करण्याकरिता देण्यात आलेली दि. २६ ऑक्टोबर २०२६ पर्यंतची मुदतवाढीनुसार जास्तीत जास्त नागरिकांना/नव मतदारांना आपली नावे मतदार यादीमध्ये नोंदविण्याची सुविधा उपलब्ध करून देण्याच्या अनुषंगाने दि. १७, १८, २४ व २५ ऑक्टोबर २०२६ या कालावधीमध्ये विशेष शिबिरे आयोजित करण्यात यावीत. सदर उपक्रम यशस्वी करण्याकरिता आपल्यास्तरावर योग्य ती कार्यवाही करावी. अधिक माहिती व उचित कार्यवाहीकरिता सोबतच्या पत्राचे अवलोकन करावे.

तसेच वेळोवेळी घेण्यात आलेली शिबिरे यांचे फोटो व आकडेवारी जिल्हाधिकारी कार्यालय, पुणे यांना कळविण्यात यावी. तसेच याबाबतची माहिती BOD लॉगीनमध्ये NSS - Gov Other Reports - Add New - योजना/उपक्रम निवडा यामध्ये उपक्रमाचे नाव **“मतदार याद्यांचा विशेष सखोल पुनरिक्षण कार्यक्रम(SIR)-2026”** या विषयाची निवड करून सादर करणे अनिवार्य आहे. **अहवाल सादर करताना ‘संक्षिप्त अहवाल/अभिप्राय/टिपणी/प्रतिक्रीया’ याठिकाणी सदर उपक्रमाकरिता सहभागी विद्यार्थ्यांची माहिती घ्यावी.** कळावे, ही विनंती.

Bhame.

संचालक (अतिरिक्त कार्यभार)
राष्ट्रीय सेवा योजना

सोबत : वरिल संदर्भीय पत्र

मुख्य निवडणूक अधिकारी, महाराष्ट्र राज्य यांचे कार्यालय

क्रमांक- ईएलआर २०२६/प्र.क्र.१०६/निवडणूक-६
सामान्य प्रशासन विभाग
मादाम कामा रोड हुतात्मा राजगुरु चौक,
मंत्रालय, मुंबई- ४०००३२.
दिनांक : १५ ऑक्टोबर, २०२६.

प्रति,

१) आयुक्त, बृहन्मुंबई महानगरपालिका तथा जिल्हा निवडणूक अधिकारी, मुंबई शहर व मुंबई उपनगर.
२) सचिव, मराठी भाषा विभाग तथा मतदार यादी निरीक्षक, मुंबई शहर व मुंबई उपनगर.
३) विभागीय आयुक्त तथा मतदार यादी निरीक्षक, कोकण विभाग (मुंबई शहर व मुंबई उपनगर वगळून).
४) सर्व अतिरीक्त जिल्हा निवडणूक अधिकारी, मुंबई शहर व मुंबई उपनगर.
५) सर्व जिल्हाधिकारी तथा जिल्हा निवडणूक अधिकारी (मुंबई शहर व मुंबई उपनगर वगळून).

विषय: **विशेष सखोल पुनरिक्षण कार्यक्रम-२०२६**
मतदार नोंदणी करीता विशेष शिबिरे आयोजित करणेबाबत.

संदर्भ : १) भारत निवडणूक आयोगाचे पत्र क्रमांक- २३/२०२५-ERS (Vol-II), दिनांक १४.०५.२०२६.
२) या कार्यालयाचे समक्रमांकाचे पत्र दि.०४.०९.२०२६ व ०९.०९.२०२६.
३) भारत निवडणूक आयोगाचे पत्र क्रमांक- २३/२०२५-ERS (Vol-II), दिनांक १२.१०.२०२६

महोदय/महोदया,

भारत निवडणूक आयोगाने दिनांक १२.१०.२०२६ च्या पत्रान्वये विशेष सखोल पुनरिक्षण कार्यक्रमाचे सुधारित वेळापत्रक जाहिर केलेले आहे. त्यानुसार दावे व हरकती सादर करण्यासाठी दिनांक ३१.०८.२०२६ ते २६.१०.२०२६ अशी मुदतवाढ दिलेली असून, अंतिम मतदार यादी दिनांक १६.११.२०२६ रोजी प्रसिध्द करावयाची आहे.

२. विशेष सखोल पुनरिक्षण कार्यक्रमाच्या अंतर्गत मतदार नोंदणी करीता सर्व मतदान केंद्रांवर विशेष नोंदणी शिबीरे आयोजित करण्याबाबत दिनांक ०९.०९.२०२६ च्या पत्रान्वये आपणांस कळविण्यात आले होते. त्यानुसार संपूर्ण राज्यामध्ये सर्व मतदान केंद्रावर विशेष नोंदणी शिबीरे आयोजित करण्यात आलेली आहेत. आता, भारत निवडणूक आयोगाने दावे व हरकती सादर करण्याकरीता देण्यात आलेली दिनांक २६.१०.२०२६ पर्यतची मुतदवाढ विचारात घेवून, जास्तीत जास्त नागरीकांना/ नव मतदारांना आपली नावे मतदार यादी मध्ये नोंदविण्याची सुविधा उपलब्ध करुन देण्याच्या अनुषंगाने दिनांक १७, १८, २४ व २५ ऑक्टोबर, २०२६ (शनिवार/रविवार) या दिवशी सर्व मतदान केंद्रांवर विशेष नोंदणी शिबीरे आयोजित करण्यात यावीत.

३. दिनांक ०९.०९.२०२६ च्या पत्रान्वये यासंदर्भात देण्यात आलेल्या सर्व सूचना उपरोक्त दिवशी आयोजित करण्यात येणाऱ्या विशेष नोंदणी शिबीराकरीता लागू राहतील. याबाबतचा नियमित अहवाल या कार्यालयास सादर करण्यात यावा, ही विनंती.

आपला,

(प्रशांत आ. नावगे)
अवर सचिव व उप मुख्य निवडणूक अधिकारी,
महाराष्ट्र राज्य.

प्रत :

सर्व उप जिल्हा निवडणूक अधिकारी.

उपजिल्हाधिकारी (भूसंपादन) क्र.१७,पुणे यांचे कार्यालय
जिल्हाधिकारी कार्यालय, दुसरा मजला, बी. विंग ,पुणे

E Mail ID- sloa17pune@gmail.com

क्र.उपजिभूसं/१७ /निवडणूक-1/कावि/ ३५ /२०२६ दि. १३/१०/२०२६

प्रति,

१.मा. कुलसचिव
सावित्रीबाई फुले विद्यापिठ पुणे

२.भारती विद्यापिठ , पुणे

३.यशवंतराव चव्हाण मुक्त विद्यापिठ , पुणे

४.एम. आय. टी. पुणे

५.डी. वाय. पाटील, पुणे

विषय:- मतदार याद्यांचे विशेष सखोल पुनरिक्षण कार्यक्रम -२०२६ सुधारित वेळापत्रक

संदर्भ:-१) मा. भारत निवडणुक आयोग यांचेकडील पत्र क्र. २३/२०२५-ERS (Vol.II) दिनांक १४/०५/२०२६

२) मा. भारत निवडणुक आयोग यांचेकडील पत्र क्र. २३/२०२६-ERS (Vol.II) दिनांक १९/०८/२०२६

३) मा. मुख्य निवडणुक अधिकारी महाराष्ट्र राज्य यांचे कडील पत्र क्र ईएलआर २०२६/प्र.क्र १०६/नि-६ दिनांक ०९/०९/२०२६.

४) मा. मुख्य निवडणुक अधिकारी महाराष्ट्र राज्य यांचे कडील पत्र क्र- ईएलआर २०२६/प्र.क्र.१०६/नि-६ दि.२९.०९.२०२६

५) या कार्यालयाकडील पत्र क्र. उपजिभूसं/१७ /निवडणूक-1/कावि/२६/२०२६ दि. ३०/०९/२०२६

६) मा. मुख्य निवडणुक अधिकारी महाराष्ट्र राज्य यांचे कडील पत्र क्र- ईएलआर २०२६/प्र.क्र.70/नि-६ दि. १२. १०.२०२६

उपरोक्त विषयाबाबत वरील संदर्भिय पत्राचे अवलोकन करण्यात यावे संदर्भ क्र. **६** च्या अन्वये उपरोक्त विषयाबाबत मा. भारत निवडणूक आयोगाच्या संदर्भाधीन दिनांक-१२/१०/२०२६ च्या पत्राची प्रत यासोबत जोडली आहे.

दिनांक ०१/१०/२०२६ या अर्हतादिनांकावर आधारीत मतदार यादीचा विशेष सखोल पुनरिक्षण कार्यक्रम (SIR)अंतर्गत प्रसिध्द केलेल्या प्रारुप मतदार यादीसाठी दावे व हरकती दाखल करण्याचा कालावधी दिनांक २६/१०/२०२६ पर्यत वाढविण्यात आला आहे.

ज्या विद्यार्थ्यांचे वय १८ वर्षे पूर्ण झालेली आहेत आणि त्यांची मतदार म्हणून नाव नोंदणी होऊ शकलेली नाही अशा युवकांची मतदार नोंदणी करण्याकरिता आपल्या विधानसभा मतदार संघातील सर्व शाळा व महाविद्यालयांमध्ये विशेष शिबिरांचे आयोजन करण्यात यावे व अशा नव युवा नागरिकांची नावे जास्तीत जास्तपणे मतदार म्हणून नोंदविता येतील यासाठी विशेष प्रयत्न करण्यात यावेत व याबाबतचा केलेला अहवाल व घेणेत आलेली शिबिरे यांचे फोटो व आकडेवारी या कार्यालयाकडून स्प्रेडशिट पाठविली जाईल त्यामध्ये भरुन घेणेची दक्षता घेणेत यावी.

(अमिता तळेकर)
उपजिल्हाधिकारी तथा
स्वीप नोडल अधिकारी ,पुणे

प्रत:- 1.मा. मुख्य निवडणूक अधिकारी , महाराष्ट्र राज्य, मुंबई यांजकडे माहितीस्तव सविनय सादर.
2.मा.विभागीय आयुक्त , पुणे विभाग पुणे (सामान्य प्रशासन विभाग) यांजकडे सविनय सादर.
3.उपजिल्हा निवडणूक अधिकारी , पुणे यांचेकडे माहितीसाठी.

मुख्य निवडणूक अधिकारी कार्यालय, महाराष्ट्र राज्य

क्र.संकीर्ण-२०२६/प्र.क्र.५२/निवडणूक-५
सामान्य प्रशासन विभाग,
मादाम कामा रोड, हुतात्मा राजगुरु चौक,
पाचवा मजला, विस्तार इमारत,
मंत्रालय, मुंबई-४०० ०३२
दिनांक : ३० सप्टेंबर,२०२६.

प्रति,

१. आयुक्त, बृहन्मुंबई महानगरपालिका तथा जिल्हा निवडणूक अधिकारी, मुंबई शहर व मुंबई उपनगर
२. जिल्हाधिकारी तथा अतिरीक्त जिल्हा निवडणूक अधिकारी, मुंबई शहर व मुंबई उपनगर
३. उर्वरित सर्व जिल्हाधिकारी तथा जिल्हा निवडणूक अधिकारी,
४. महापालिका आयुक्त, सर्व महानगरपालिका.
५. मुख्याधिकारी, सर्व नगरपालिका /नगरपंचायती.

विषय : विशेष सखोल पुनरीक्षण (SIR) २०२६ अंतर्गत दावे व हरकती दाखल करण्याचा कालावधी दिनांक १२ ऑक्टोबर २०२६ पर्यंत वाढविण्यात आला असून, त्यानिमित्त राबवावयाचे विशेष मतदार जागृती व नोंदणी उपक्रम.

संदर्भ :- भारत निवडणूक आयोग यांचे प्रेस नोट क्र.इसीआय/पीएन/१२०/२०२६, दि.२६.९.२०२६

महोदय/महोदया,

उपरोक्त विषयान्वये कळविण्यात येते की, भारत निवडणूक आयोगाने राज्यातील मतदार याद्यांच्या विशेष सखोल पुनरीक्षण (SIR) कार्यक्रमाला मुदतवाढ दिली असून, त्यानुसार दावे व हरकती दाखल करण्याचा कालावधी आता दि.१२ ऑक्टोबर २०२६ पर्यंत वाढविण्यात आला आहे. या वाढीव कालावधीचा प्रभावी वापर करून, राज्यातील प्रत्येक पात्र नागरिकाचे नाव मतदार यादीत अचूकपणे नोंदविले जावे या उद्देशाने आजपासून ते दि.१२ ऑक्टोबर २०२६ या कालावधीत खालीलप्रमाणे विशेष मतदार जागृती व नोंदणी उपक्रम राज्यभर राबविण्याकरीता खालीलप्रमाणे कार्यवाही करावी.

१. विशेष मतदार नोंदणी शिबीरांचे आयोजन (दि.३ व ४ ऑक्टोबर तसेच १० व ११ ऑक्टोबर २०२६)

भारत निवडणूक आयोगाच्या दिनांक २६.९.२०२६ रोजीच्या प्रसिध्दीपत्रकात नमुद सुचनांनुसार जुळवणी न झालेल्या/जुळवणीमध्ये विसंगती आढळलेल्या ज्या मतदारांना नोटीसा देण्यात आलेल्या असतील, त्यांच्या घरी भेट देऊन कागदपत्रे जमा करून घ्यावयाची आहेत. त्यापैकी कोणत्याही मतदारास मदत करण्याकरीता मतदान केंद्रस्तरीय अधिकारी दि.३ व ४ ऑक्टोबर तसेच १० व ११ ऑक्टोबर २०२६ हे चार दिवस त्यांच्या मतदान केंद्रात उपस्थित राहतील व नवमतदारांची नाव नोंदणी, प्रारुन मतदार यादितील नावांची पडताळणी, सुधारणा/दुरुस्ती अर्ज भरण्याकरीता मतदारांना मदत करणे, सदर

कार्यवाही करताना मतदारांची दुबार नोंदणी होणार नाही याची दक्षता घेणे आवश्यक राहील. तसेच नोटीस प्राप्त व्यक्तींची कागदपत्र जमा करुन घेणे इ. कार्यवाही करतील.

२. **महाविद्यालयांमध्ये विशेष मतदार नोंदणी शिबीरांचे आयोजन (दि.५ ते ९ ऑक्टोबर, २०२६) :-**

२.१ महाविद्यालयातील १०० टक्के विद्यार्थ्यांची मतदार नोंदणी होण्याच्या उद्देशाने जिल्ह्यातील सर्व महाविद्यालयांमध्ये महाविद्यालयातील सर्व कर्मचारी व राष्ट्रीय सेवा योजना (NSS) च्या स्वयंसेवकांच्या सहकार्याने दि.५ ते ९ ऑक्टोबर २०२६ या कालावधीत विद्यार्थ्यांसाठी विशेष मतदार नोंदणी शिबिरे आयोजित करावीत.

२.२ सदर शिबीराकरीता महाविद्यालयातील राष्ट्रीय सेवा योजनेत (NSS) कार्यरत विद्यार्थ्यांना व त्यांच्या माध्यमातून सर्वच विद्यार्थ्यांना ECINET App व voters.eci.gov.in वर मतदारांची नावे तपासणे व त्यांच्याकडून ऑनलाईन पध्दतीने नमूना क्र.६ व ८ भरण्याबाबतचे प्रात्यक्षिक देण्यात यावीत.

२.३ दि.१ ऑक्टोबर, २०२६ या अर्हता दिनांकास वय वर्षे १८ पूर्ण झालेल्या सर्व विद्यार्थ्यांची मतदार नोंदणी झालेली आहे किंवा नाही, याची प्रत्यक्ष खातरजमा (प्रारुप मतदार यादित त्यांचे नाव आहे किंवा नाही) करावी.

२.४ ज्या विद्यार्थ्यांची मतदार नोंदणी झालेली नसल्यास त्यांचा ऑनलाईन नमुना क्र.६ भरून घ्यावा.

२.५ इतर विधानसभा मतदारसंघामधून/इतर जिल्ह्यांमधून महाविद्यालयांमध्ये शिक्षणासाठी आलेल्या विद्यार्थ्यांची नोंदणी शक्यतो ऑनलाईन नमुना ६ मध्ये भरून घ्यावी. ऑफलाईन नमुना ६ मध्ये नोंद केलेले अर्ज, त्यांच्या मूळ निवासाच्या पत्त्यानुसार जिल्हयांतर्गत संबंधित विधानसभा मतदान नोंदणी अधिकारी यांचेकडे पाठवावेत. तर जिल्हयाबाहेरील अर्ज असल्यास ते संबंधित जिल्हाधिकारी व जिल्हा निवडणूक अधिकारी यांचेकडे ४८ तासांत वर्ग करण्याची कार्यवाही संबंधित मतदान नोंदणी अधिकारी/ सहायक मतदान नोंदणी अधिकारी यांनी करावी. इतर जिल्ह्यातील विद्यार्थ्यांचे नमुने कोणत्याही परिस्थितीत अस्विकृत करण्यात येवू नयेत. व यासंदर्भातील अहवाल या पत्रासोबतच्या **विवरणपत्र-१** मध्ये या कार्यालयास सादर करावा.

२.६ प्रत्येक महाविद्यालयामध्ये सर्व विद्यार्थ्यांच्या याद्यांवर सविस्तर नोंदी ठेवाव्यात व त्यांचा परिपुर्ण अहवाल याा पत्रासोबतच्या **विवरणपत्र -२** मध्ये या कार्यालयास सादर करावा.

३. **सर्वसाधारण मतदार जागृती उपक्रम (दावे व हरकती कालावधीत, १२ ऑक्टोबर २०२६ पर्यंत):-**

दि.१२ ऑक्टोवर २०२६ पर्यंत आपल्या जिल्ह्यामध्ये पुढील उपक्रम राबवावेत:-

३.१ महाविद्यालये, शाळा परिसर व शहर भागांत प्रभात फेरी/सायकल रॅली यांचे आयोजन करावे.

३.२ बसस्थानक-रेल्वे स्थानक व सार्वजनिक ठिकाणी पथनाट्यांचे (Street Play) आयोजन करावे.

३.३ विद्यार्थी व पालकांचे संकल्प पत्र संकलन तसेच मानवी साखळी ('Proud Voter') असे उपक्रम आयोजित करण्यात यावेत.

३.४ त्याचबरोबर रांगोळी, पोस्टर मेकिंग, प्रश्नमंजुषा व रील्स/मीम मेकिंग स्पर्धा ("माझा मताधिकार" या विषयावर आधारित) महाविद्यालयीन स्तरावर आयोजित करून जास्तीत जास्त विद्यार्थ्यांचा सहभाग सुनिश्चित करावा.

३.५ जिल्ह्यातील प्रत्येक ग्रामपंचायत व नागरी वॉर्डात विशेष मतदार जागृती सभा घेण्यात याव्यात.

४. उद्योग समूह, कंपन्या व गृहनिर्माण संस्था (दावे व हरकती कालावधीत, १२ ऑक्टोबर २०२६ पर्यंत):-

४.१ मतदार जागृती मंचामार्फत जिल्ह्यातील उद्योग समूह, कंपन्या व संस्थांमधील कर्मचाऱ्यांसाठी तसेच गृहनिर्माण संस्थांमध्ये विशेष नोंदणी शिबिरे याच कालावधीत आयोजित करण्यात यावीत.

४.२ गृहनिर्माण संस्थांच्या सचिव/पदाधिकाऱ्यांच्या व सहकारी गृहनिर्माण फेडरेशनच्या सहकार्याने १०० टक्के मतदार नोंदणी सुनिश्चित करावी. या संदर्भातील या कार्यालयाच्या पत्र क्रमांक ईएलआर-२०२६/प्र.क्र.४८/नि-६ दिनांक १५.९.२०२६ मधील सूचनांचे पालन करण्यात यावे.

५. विशेष व वंचित घटक (दावे व हरकती कालावधीत, १२ ऑक्टोबर २०२६ पर्यंत):-

एकही पात्र नागरिक नोंदणीपासून वंचित राहणार नाही, या उद्देशाने दिव्यांग (PWD), तृतीयपंथीय, विशेषतः असुरक्षित आदिवासी समूह (PVTGs), भटक्या-विमुक्त जमाती, देह व्यवसाय करणाऱ्या महिला (FSW) तसेच बेघर नागरिक, मजूर व रात्र-निवाऱ्यांमध्ये राहणारे नागरिक यांच्यासाठी संबंधित विभाग व NGOs/CSOs यांना पुर्वसूचना देवून त्यांच्या सहकार्याने विशेष मदत कक्ष व नोंदणी शिबिरे आयोजित करण्यात यावीत.

६. प्रसारमाध्यम व सोशल मीडिया मोहीम (दावे व हरकती कालावधीत, १२ ऑक्टोबर २०२६ पर्यंत) :-

६.१ मेट्रो, रेल्वे स्थानके, विमानतळ, एमएसआरटीसी बसस्थानके, महानगरपालिका व आरटीओ कार्यालयांतील डिजिटल होर्डिंग्ज, तसेच घंटागाडी व सार्वजनिक वाहतूक व्यवस्थेवरील उद्घोषणा यंत्रणेचा वापर करून जनजागृती करावी.

६.२ दूरदर्शन/मराठी वृत्तवाहिन्या व एफएम रेडिओवर मुलाखती आयोजित कराव्यात, तसेच #SIRMaharashtra२०२६, #Voter Registration२०२६, #InformedVoter या हॅशटॅगसह दैनंदिन सोशल मीडिया मोहीम राबविण्यात यावी.

७. मतदान केंद्रस्तरीय अधिकारी यांनी सर्व राजकीय पक्षांचे मतदान केंद्रस्तरीय प्रतिनिधी यांच्याशी समन्वय ठेवून जास्तीत जास्त नव मतदार तसेच अन्यत्र स्थलांतरीत मात्र अन्यथा पात्र सर्व मतदारांचे अंतिम मतदार यादीत समावेशन होईल यासाठी विशेष प्रयत्न करण्यात यावे.

८.	उपरोक्त सर्व उपक्रम विहित कालावधीत काटेकोरपणे राबविण्यात यावेत व त्याबाबतचा अहवाल विहित वेळेत सादर करण्यात यावा, ही विनंती.

आपला,

(मनोहर पारकर)
सह सचिव तथा सह मुख्य निवडणूक अधिकारी

सोबत- विवरणपत्र -१ व २

प्रत- सर्व उप जिल्हा निवडणूक अधिकारी, जिल्हा निवडणूक अधिकारी कार्यालये

विवरणपत्र-१

महाविद्यालयाचे नांव	जिल्हयांतर्गत इतर विधानसभा मतदार संघातील नमुना ६ सादर केलेल्या विद्यार्थ्यांची संख्या	जिल्हयांबाहेरील इतर विधानसभा मतदार संघातील नमुना ६ सादर केलेल्या विद्यार्थ्यांची संख्या
१	२	३

विवरणपत्र-२

महाविद्यालयाचे नांव	महाविद्यालयातील विद्यार्थ्यांची संख्या	मतदार यादीत नांव नोंदविलेल्या विद्यार्थ्यांची संख्या	विशेष शिबीरामध्ये नमुना ६ भरलेल्या विद्यार्थ्यांची संख्या	अदयाप नोंदणी न झालेल्या विद्यार्थ्यांची संख्या
१	२	३	४	५